**कोणती जोडी विरुद्धार्थी नाही?**

1) कर्णकटू × कर्णमधुर

2) गोड × चिमुकले, लहानगे

3) राग × लोभ

4) उच्च × नीच

**कोणती जोडी समानार्थी नाही?**

1) जन्म – मृत्यू

2) झाड – वृक्ष

3) झोप – निद्रा

**विरामचिन्हे वापरा.**

1) सुनिल म्हणाला अरे आजकाल कित्येक लहान मुलेही उत्तम क्रिकेट खेळतात.

2) हो खरंच आहे हे

**वचन बदला.**

१. गिरक्या
२. पान
३. झाडे

**पुढील शब्दातील अक्षरापासून अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

१. धरणीमाता
२. वातावरण

**पुढील वाक्यातील वाक्प्रचार अधोरेखित करा.**

1) आईच्या जोरदार हाकेमुळे सोनालीच्या स्वप्नांचा चुराडा झाला.

2) माकडांनी आमराईत घुसून बऱ्याचशा आंब्यांचा चेंदामेंदा केला.

**वाक्प्रचार व त्यांच्या अर्थांच्या जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| 1) चाहूल लागणे – | चीज होणे, फळ मिळणे. |
| 2) सार्थक होणे – | अतिशय वाईट वाटणे. |
| 3) भान विसरणे – | सुगावा लागणे, अंदाज घेणे. |
| 4) जीव फुटून जाणे – | गुंगून जाणे, तल्लीन होणे. |

**पुढील वाक्यात योग्य वाक्प्रचारांचा वापर करा.**

1) पावश्या पक्ष्यांचा आवाज ऐकून येणाऱ्या पावसाचा अंदाज येतो.

2) खूप कष्ट केले की कधीतरी त्याचे चांगले फळ मिळते.

3) सावकरांवरील चित्रपट पहाताना मीना गुंगून गेली.

4) सावकारांना झालेल्या शिक्षा बघताना खूप वाईट वाटत होते.

**पुढील वाक्यातील वाक्प्रचार अधोरेखित करा.**

1) कोकीळ गाऊ लागला की वसंतऋतूच्या येण्याची चाहूल लागते.

2) आकाश कलेक्टर झाल्याचे कळताच आईच्या जीवनाचे सार्थक झाले.

3) लताचे जुने गाणे ऐकताच माझे भान हरपते.

4) माझी ताई पाच वर्षासाठी परदेशी जात असताना आमच्या साऱ्यांचा जीव फुटून गेला.